माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: १३६/२०२३**

| **तक्रारकर्ता** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्रीमती कलावतीबाई शामरावजी वानखेडे,ह.मु. बैलवाडा पो. गुमथी, ता. जि. नागपूर-४४११११ | सचिव, गट ग्रामपंचायत, केसोरी (अंबाडी), ता. कामठी, जि. नागपूर | विस्तार अधिकारी (कृषी), पंचायत समिती, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर |

## सुनावणी दिनांक १७.१२.२०२४

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १९६६/२०२० दिनांक ०२.०८.२०२२ पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे *आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक १७.१२.२०२४* रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री. डी. डी. शेंडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. ए. एन. सोरते व प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषी), श्री. गजानन सरपूरीया उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय (अपील क्र. १९६६/२०२०) मध्ये दिनांक ०२.०८.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" जन माहिती अधिकारी यांनी अद्याप उपलब्ध असलेली माहिती प्रदान केलेली नाही. सबब सदर बाब लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्रदान करण्यास कसूर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.०८.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशाचे तात्काळ पालन करण्यात येवून विनाशुल्क माहिती प्रदान करण्यात यावी. माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसात अपिलार्थीस/पत्रव्यवहार करणे/शुल्क कळविणे/निरिक्षण देणे/कार्यवाही प्रलंबित असल्यास तसे पत्रान्वये कळविणे याबाबी अपेक्षीत आहे. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चा भंग केला असे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) अन्वये शास्ती का करु नये, याचा खुलासा त्यांनी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात आयोगास सादर करावा. अपीलार्थीस माहिती मिळविण्यासाठी झालेल्या मानसिक, शारिरीक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार नुकसान भरपाई मिळण्यास देखील पात्र असून सदर विभागामार्फत त्यांना रु. ५,०००/- (अक्षरी पाच हजार रुपये फक्त्) नुकसान भरपाई धनादेशाद्वारे प्रदान करावी. वरील नुकसान भरपाई अपीलार्थीस माहिती न देण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वसूल करावयाचे अधिकार हे कार्यालय प्रमुखांना असतील. वरील

नुकसान भरपाई सदर आदेश प्राप्त होताच ४ आठवडयाच्या आत अपीलार्थीस प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी" या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आला होता.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक ०३.०५.२०२३ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "आयोगाच्या आदेशाची प्रभावी व काटेकोरपणे अंमलबजावणी न करता अवमान व अवहेलना करुन जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. तसेच आयोगाचे आदेशास ४ आठवडयापेक्षा जास्त कालावधी लोटुन सुध्दा नुकसान भरपाईचा धनादेश देण्यात आला नाही. आयोगाने दिलेल्या आदेशाची जन माहिती अधिकारी यांनी अवहेलना केलेली असल्याने त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. जोडपत्र-अ अर्जाची संपूर्ण माहिती व नुकसान भरपाईचा धनादेश प्राप्त करुन देण्याची कृपा करावी" अशी आयोगास विनंती केली आहे.

व्दितीय अपील क्र. १९६६/२०२० संदर्भात दिनांक ०२.०८.२०२२ रोजी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी दिनांक २२.०२.२०२३ च्या पत्रान्वये श्री. काशिनाथ गुलाब वानखेडे यांना ग्रामपंचायतने दिलेल्या अनुक्रमे दिनांक ०६.०८.२०१९, दि. १९.०९.२०१९ व दि. १५.१०.२०१९ च्या नोटीसची छायांकित प्रत तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन दिली आहे. तसेच तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाईचा धनादेश दिनांक २८.०८.२०२३ रोजी प्रत्यक्ष देण्यात आला आहे. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या एकुण ४ अपील आदेशान्वये प्रत्येकी रु. ५०००/- प्रमाणे एकुण रु. २०,०००/- चा धनादेश दिनांक १७.०८.२०२३ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, कृषि पंचायत समिती कामठी यांचेकडून प्राप्त झाला, असे नमुद करुन तक्रारकर्ता यांनी स्वाक्षरीनिशी पोहच दिलेली आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी झाली आहे. तक्रारकर्ता यांच्या तक्रारीत तथ्यांश दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.




सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक: १७.१२.२०२४**

जा.क्र. 1801 दि. 28 MAR 2025

E:\तक्रार क्र. 136/2023- वानखेडे.docx